करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - 137


महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क्र : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖


क्रमांक: साशा कार्या/ब-5/करोनाविषाणु/प्रतिबंधात्मक उपाययोजना/2020 दिनांक :२७/03/2020.

प्रति,
तहसिलदार पनवेल

विषय :- शासकीय कर्मचाऱ्यांची मार्च महिन्याची वेतन देयके कोषागारात सादर करण्याकरिता लॉकडाऊन मधून सूट देणेबाबत.

संदर्भ :- विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण , कोकण विभाग, पनवेल यांचेकडील पत्र क्र.विससं/उशि/कोविप/मशि/1/2020/561, दि.26.3.2020

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांनी संदर्भीय पत्रान्वये, त्यांच्या विभागाच्या अधिपत्याखालील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या 5 जिल्हयातील अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदानाबाबतची देयके कोषागारामार्फत सादर करण्यात येवून त्याची अदायगी संबंधीत महाविद्यालयांना नियमित केली जात असल्याने, या महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या माहे मार्च 2020 ची वेतनाची कामे पूर्ण होण्याकरिता खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांना दोन दिवस लॉकडाऊन मधून सुट मिळण्याबाबत विनंती केली आहे.

1. डॉ.संजय जगताप, विभागीय सहसंचालक, कोकण विभाग, पनवेल.
2. श्री.ईश्वर जाधव, लिपिक, विभागीय सहसंचालक कार्यालय, कोकण विभाग, पनवेल.
3. श्री.दिपक किसन फणसे, शिपाई, दादासाहेब लिमये कळंबोली कॉलेज, कळंबोली.

तरी, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांचेकडील संदर्भीय पत्राचे अनुषंगाने, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या माहे मार्च 2020 ची वेतनाची कामे पूर्ण होण्याकरिता वरीलप्रमाणे नमूद अधिकारी व कर्मचारी यांना प्रवास करणेबाबतची पास देणेबाबतची कार्यवाही आपले स्तरावरून करणेत यावी. सोबत संदर्भीय पत्राची छायाप्रत जोडलेली आहे.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी रायगड

प्रत :- पोलीस उपायुक्त, परिमंडळ 02, पनवेल यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
प्रत :- विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांना माहितीसाठी.

Scanned with CamScanner